**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कार्यपुर्तता अहवाल तपासणी तथा कामाच्या शेऱ्यांचे दर्जोन्नती करण्याची कार्यपद्धती निश्चित करणेबाबत**

## महाराष्ट्र शासन

### ग्राम विकास विभाग

### शासन परिपत्रक क्रमांकः मुग्रायो-२०१७/प्र.क्र.१५४/पंरा-७

बांधकाम भवन, ७ वा मजला, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१
तारीख: ७ ऑक्टोबर, २०१७

वाचा -१) **शासन निर्णय क्र.ग्रासयो २०१५/प्र.क्र.१२/योजना-९, दिनांक २८.१०.२०१५**
**२) मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो., पुणे यांचे पत्र क्र.१०७,दि.२७/७/२०१७**

**प्रस्तावना-**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर त्रिस्तरीय गुणवत्ता तपासणी पद्धत अवलंबिण्यात येत आहे. त्यास अनुसरुन राज्य गुणवत्ता निरीक्षक (SQM) यांच्या तपासणी अहवालाच्या बाबतची तसेच वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक (SSQM) यांच्या तपासणी अहवालाच्या बाबत पुढील आवश्यक कार्यवाही करणेबाबतची कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे धोरण ठरविण्यात येत आहे.

**परिपत्रक:-**

**अ)राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्या तपासणी अहवालाबाबत करावयाची कार्यवाही-**

१) राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेकडून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत रस्त्याच्या कामांची टप्पेनिहाय तपासणी करुन अहवाल राज्य गुणवत्ता समन्वयक तसेच संबंधीत कामाचे कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांना सादर केले जावेत.

२) सदर अहवालानुसार ज्या रस्त्याच्या कामांना राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेकडून असमाधानकारक (U) किंवा समाधानकारक तथा सुधारणा आवश्यक (SRI) शेरा केला जातो, अश्या कामांचे कार्यपुर्तता अहवाल संबंधीत कामाचे कार्यकारी अभियंता यांचे मार्फत राज्य गुणवत्ता समन्वयक कार्यालयास सादर केले जावेत.

३) सदर कार्यपुर्तता अहवालाची तांत्रिक छाननी करुन अहवालाची दर्जोन्नती राज्य गुणवत्ता समन्वयक यांचेकडून केली जावी.

**ब)वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्या तपासणी अहवालाबाबत करावयाची कार्यवाही-**

१) वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत रस्त्याच्या कामांची तपासणी करुन तपासणी अहवाल राज्य गुणवत्ता समन्वयक तसेच संबंधीत कामाचे कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांचेकडे सादर करण्यात यावेत.

२) सदर अहवालानुसार ज्या रस्त्याच्या कामांना वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेकडून असमाधानकारक किंवा समाधानकारक तथा सुधारणा आवश्यक शेरा केला जातो, अश्या कामांचे कार्यपुर्तता अहवाल संबंधीत कामाचे कार्यकारी अभियंता यांचेकडून प्रथम अन्य राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेकडून छाननी करुन (Verification) तदनंतर राज्य गुणवत्ता समन्वयक कार्यालयास सादर केले जावेत.

३) सदर कार्यपुर्तता अहवालाची तांत्रिक छाननी करुन राज्य गुणवत्ता समन्वयक यांचे अभिप्रायासह मुख्य अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) यांचेकडे सादर करण्यात यावेत.

४) सदर कार्यपुर्तता अहवालाची मुख्य अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) यांनी छाननी करुन अहवाल दर्जोन्नत करावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००७१६४२३४०२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R A Nagargoje

Digitally signed by R A Nagargoje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=decff3a81eacee2237c8c2d29460e7c459d9f7baaab677f7578d952747d49ab2, cn=R A Nagargoje
Date: 2017.10.07 18:03:02 +05'30'

**(र.आ.नागरगोजे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य अभियंता, प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, कॅम्प ऑफीस, पुणे.

२) राज्य गुणवत्ता समन्वयक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्था

३) अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र राज्य ग्रामीण विकास संस्था

४) वित्तीय नियंत्रक (प्रमंग्रासयो) बांधकाम भवन , ग्रा.वि.वि.

५) कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्था

६) सचिव, मु.मं.ग्रा.स.यो. यांचे स्वीय सहायक

७) निवड नस्ती (बांधकाम-४), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट मुंबई.